सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २७ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# उद्या होणाऱ्या TET परीक्षेचा पेपर फुटला, परीक्षा रद्द

## भिवंडीतून प्रश्नपत्रिका विकणारे पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई**

राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) पुन्हा एकदा पेपरफुटीच्या वादात अडकली आहे. ठाणे जिल्ह्यात उद्या होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर उद्या होणारी परीक्षा स्थगित करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, शिक्षण विभागाकडून याबाबत अधिकृत आदेश जाहीर होण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्यातून पेपरफुटी झाल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणी पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले आहे. त्यामुळे देशभरात नीट (छएएढ) परीक्षा पेपरफुटी प्रकरणानंतर आता आणखी एका महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परीक्षेचे निवेदन, परीक्षा रद्द झाल्याची घोषणा




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १,०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पुढे ढकलण्यात आली असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे. परीक्षा पारदर्शकत होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत टीईटी परीक्षा सुरक्षित व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. तथापि, दि. २७ जून २०२६ रोजी पहाटे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार भिवंडी येथे काही व्यक्तींना टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत माहिती असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यानुसार भिवंडी पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकून तपासणी केली.

### ३ जण पोलिसांच्या ताब्यात

ढएढ पेपर फुटीप्रकरणी पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) चा पेपर लीक करणाऱ्या टोळीविरुद्ध भिवंडीत कारवाई झाली. कोनगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी सापळा लावून ३ जणांना ताब्यात घेतले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी भिवंडीतील कोनगाव पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद होत आहे. त्यानंतर आरोपींवर कारवाई केली जाणार आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान संबंधित व्यक्तींकडे आढळलेल्या काही प्रश्न आणि शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) जून २०२६च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न समान असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने दि. २८ जून २०२६ रोजी नियोजित टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून घेण्यात आला आहे. टीईटी परीक्षेच्या नव्या तारखेसह इतर अद्ययावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे परिषदेकडून कळविण्यात आले आहे.

# विमानापेक्षा इमान महत्त्वाचं!

## उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यावर आणि फडणवीसांसह विमानप्रवासावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७रायगड** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर



राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापले आहे. फुटलेल्या खासदारांच्या मतदारसंघात जाऊन उद्धव ठाकरे जाहीर सभा घेत असताना, त्यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगडावरून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. उद्धव ठाकरेंच्या विदर्भ दौऱ्यापासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या विमानप्रवासापर्यंत विविध मुद्द्यांवर शिंदे यांनी टोलेबाजी केली. उद्धव ठाकरे फुटलेल्या खासदारांच्या मतदारसंघात सभा घेत असल्याबाबत विचारले असता शिंदे म्हणाले, काय बोलणार मी? जाहीर सभा घ्यायला मीच त्यांना लावलं आहे. मी सगळ्यांना कामाला लावलं आहे. यानंतर त्यांनी खोचक शब्दांत टीका करत म्हटले, ही तर वरातीमागून घोडे अशी परिस्थिती आहे. सगळे जण निघून गेल्यावर आता हे पोहोचत आहेत. त्याचा काय उपयोग? 'जो हौद से गया, वो बूंद से नहीं आता', असा टोला त्यांनी लगावला. शिवसेनेतील सहा खासदार शिंदे गटात दाखल झाल्यानंतर उद्धव ठाकरे त्यांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. मुंबईनंतर त्यांनी यवतमाळमध्ये सभा घेतली असून, पुढे इतर मतदारसंघांचाही दौरा नियोजित आहे.उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरला जाताना एकाच विमानातून प्रवास केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले, विमानापेक्षा इमान महत्त्वाचं असतं. ते पुढे म्हणाले, २०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेने एकाच विमानातून प्रवास करण्यासाठी आम्हाला तिकीट दिलं होतं. पण त्यावेळी त्यांनी काँग्रेसच्या बुडत्या जहाजात बसण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आज जे काही घडत आहे, त्याची सुरुवात तेव्हाच झाली होती.

### 'देवेंद्रजींनी कपटी मित्र किती घातक असतो हे अनुभवलंय'

२०१९ च्या राजकीय घडामोडींचा संदर्भ देत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर पुन्हा निशाणा साधला. देवेंद्र फडणवीस खूप हुशार आहेत. २०१९ मध्ये कपटी मित्र किती घातक असतो, याचा अनुभव त्यांनी घेतला आहे. त्यामुळे यावर मला आणखी काही बोलण्याची गरज नाही, असे ते म्हणाले.

## यवतमाळच्या सभेत उद्धव ठाकरेंचा घणाघात

# गद्दारांनी आईची शपथ घेऊन विश्वासघात केला

### म्हणाले- पुढचा खासदार आमचाच निवडून येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७यवतमाळ**



जी लोकं कालपर्यंत माझ्यासोबत होती आणि आज ती फुटली, या लोकांची मला लाज वाटते. माझ्या नावावर आणि माझ्या दौऱ्यांमुळेच हे खासदार निवडून आले होते. या गद्दारांनी चक्क आईची शपथ घेऊन गद्दारी केली आणि गद्दारांच्या कळपात जाऊन सामील झाले. म्हणूनच, या मतदारसंघात येऊन मी माझ्या मतदारांची जाहीर माफी मागण्यासाठी आलो आहे, अशा भावनिक शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांचे वाभाडे काढले. यवतमाळच्या महासभेत बोलताना त्यांनी बंडखोर खासदार संजय देशमुख यांचा एक जुना व्हिडिओही दाखवला.

### पक्ष चोरला, चिन्ह चोरले, तरी ठाकरे उभे

केंद्रीय यंत्रणा आणि सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढवताना उद्धव ठाकरे म्हणाले, यांनी आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, आमदार-खासदार फोडले तरीही ठाकरे आज ताठ कण्याने मैदानात उभा आहे. आमदार फोडल्यानंतरही शिवसैनिकांनी मेहनत करून या खासदारांना पुन्हा निवडून दिले होते, पण हे विकले गेले. सध्या राज्यात निवडणुका नसतानाही ही फोडाफोडी सुरू आहे. पण मी सांगतो, जोपर्यंत जनतेचे प्रश्न संपत नाहीत, तोपर्यंत कोणीही ठाकरे किंवा शिवसेना संपवू शकणार नाही. जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याच मतदारसंघातून पुन्हा ठाकरेंचाच खासदार निवडून येईल.

### राम मंदिराच्या दानपेटीत चोरी आणि विकासनिधीवर सवाल

भाजपवर थेट निशाणा साधत उद्धव ठाकरे म्हणाले, आज देशात राम मंदिराच्या दानपेटीतील पैसे चोरले जात आहेत. हे सरकार केवळ लूट करत आहे. हे खासदार म्हणतात की विकासनिधीसाठी आम्ही गेलो; पण मला सांगा, हा विकासनिधी काय फक्त भाजपच्या मालकीचा आहे का? तो जनतेच्या हक्काचा पैसा आहे. ६ खासदारांच्या बंडानंतर विदर्भातील पहिल्याच सभेत उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांना थेट गाडण्याचा इशारा दिला असून, या सभेला शिवसैनिकांनी गर्दी केली होती.

# बावनकुळेंकडून विश्वास नांगरे पाटलांचे समर्थन

## संघाविषयी चांगले बोलले तर चुकीचे काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**– राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना राज्यातील विविध राजकीय आणि प्रशासकीय मुद्द्यांवर भाष्य केले.

अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा एकाच विमानाने झालेला प्रवास आणि पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी संघाचे केलेले कौतुक यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. तसेच, आरटीओ अधिकाऱ्यांच्या बदल्यांमधील घोटाळा आणि महसूल विभागातील तफावतीबाबतही त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी नुकताच एका प्रवासी विमानाने एकत्र प्रवास केला. यावरून सुरू झालेल्या राजकीय चर्चांवर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. आमचे आदर्श मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला



साद घालत 'प्रायव्हेट जेट'ऐवजी 'प्रवासी विमानाने' प्रवास करणे पसंत केले. मी उद्धव ठाकरेंचेही आभार मानतो की त्यांनीही याला साथ दिली आणि देशाच्या हितासाठी एक आदर्श उदाहरण ठेवले.

विमानात बसल्यावर चर्चा होतातच, पण त्या कौटुंबिक असू शकतात. प्रत्येक वेळी राजकारणाचीच चर्चा होत नसते. विशेषतः प्रवासी विमानात इतके लोक ऐकणारे असतात, तिथे काय राजकीय चर्चा करणार? असा प्रतिप्रश्न त्यांनी केला.

याच वेळी शिंदे गटात भीतीचे वातावरण असल्याच्या दाव्याचे खंडन करत त्यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि आम्ही सर्वजण गेल्या ३० वर्षांच्या शिवसेना-भाजप युतीच्या माध्यमातून घट्ट बांधलेलो आहोत.

नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (ठडड) कार्यक्रमात संघाची स्तुती केल्याने राज ठाकरे यांनी त्यांच्यावर टीका केली होती. यावर बावनकुळे यांनी नांगरे पाटलांची पाठराखण केली. विश्वास नांगरे पाटील यांनी केलेले भाष्य योग्यच आहे.

ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या देशाला गौरव मिळवून दिला आहे, तो मजबूत भारताचा कणा आहे. अशा संघाविषयी जर त्यांनी चांगले उद्गार काढले असतील, तर मला वाटते राज ठाकरे किंवा इतर कोणीही त्याकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची गरज नसल्याचे हि ते यावेळी म्हणाले.

# ३० जूननंतर जुन्या ₹१०, ₹२०, ₹५० आणि ₹१०० च्या नोटा बंद होणार?

## बँक ऑफ महाराष्ट्र ने दिले मोठे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर २००५ पूर्वी जारी करण्यात आलेल्या १०, २०, ५० आणि १०० च्या नोटा ३० जून २०२६ नंतर बँक ऑफ महाराष्ट्र बँकेच्या शाखांमध्ये स्वीकारल्या जाणार नाही अशा प्रकारचा संदेश प्रसारीत होत आहे. आता यावर बँकेने स्वस्त आपले मत स्पष्ट करत ग्राहकांची चिंता दूर केली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्याअ अधिकृत फेसबुक पेजवर स्पष्टीकरण देत हा संदेश पूर्णपणे खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे. व्हायरल पोस्टमध्ये दिलेली सर्व माहिती ही चुकीची असल्याचे बँकेने आपल्या पोस्टमध्ये सांगितले.व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये १ जुलै २०२६ पासून २००५ पूर्वीच्या १०, २०, ५० आणि १०० च्या नोटा बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये स्वीकारल्या जाणार नाहीत असे सांगण्यात आले. सोबतच त्या नोटा केवळ रिजर्व बँकेच्या अधिकृत




केंद्रांमध्येच जमा कराव्यात असा दावाही यात करण्यात आला आहे. या पोस्टमुळे सर्वसामान्य ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

मात्र, आता बँक ऑफ महाराष्ट्र ने स्वत: या दाव्याचे खंडन करत ग्राहकांना अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले अहे. त्यासोबतच, बँकिंग किंवा आर्थिक व्यवहारासंबंधी माहितीसाठी केवळ बँकेच्या अधिकृत संकेतस्थळ, सोशल मिडिया प्लॅटफॉर्म किंवा रिजर्व बँकेची अधिकृत प्लॅटफॉर्म यांचाच वापर करावा. तसेच व्हायरल होत असलेली ही पोस्ट शेअर करू नये आणि अशा दिशाभूल करणाऱ्या संदेशांपासून दूर राहण्याचे आवाहनही केले आले.

# सोशल मीडियाचा 'बॉस' कोण?

## नागपूरच्या नेत्यांमध्ये फडणवीस अव्वल, देशमुख आमदारांमध्ये नंबर १



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ नागपूर :** जनसंपर्कासाठी नेतेमंडळी देखील सोशल मीडियाचा वापर प्रभावीपणे करू लागली आहेत. फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्स वर जास्तीत जास्त फॉलोअर्स मिळवून त्यांच्यापर्यंत आपले मत, बैठका, प्रशासकीय हालचाली, प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसह विकास कामांचा आलेख मांडण्याचा प्रयत्न लोकप्रतिनिधींकडून केला जात आहे. नागपूर जिल्ह्यातील आमदारांचा विचार करता राज्याचे मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस हे सोशल मीडियातील फॉलोअर्समध्येही 'बॉस' आहेत. त्यांच्यापाठोपाठ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचीही सोशल मीडियावर घोडदौड सुरू आहे.

मंत्र्यांमध्ये एक वलय असते, त्यामुळे त्यांच्या फॉलोअर्समध्येही वाढ होते. पण जिल्ह्यातील फक्त आमदारांचा विचार करता भाजपचे सावनेरचे आ. डॉ. आशिष देशमुख यांची सोशल मीडियावरील कामगिरीही दमदार ठरली असून ते फॉलोअर्समध्येही नंबर १ आहेत. फेसबूकवर त्यांचे १ लाख ६२ हजारांहून अधिक फॉलोअर्स आहेत.

| नेते | फेसबुक | इंस्टाग्राम | एक्स |
|---|---|---|---|
| देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री | ९६,००,००० | २८,००,००० | ५८,००,००० |
| आ. डॉ. नितीन राऊत, काँग्रेस | १,०२,००० | ३९,४०० | २०,३३,००० |
| आ. विकास ठाकरे, काँग्रेस | २९,००० | ४१,२०० | ५९९४ |
| चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री | ३,८९,००० | १,८८,००० | १,१२,९०० |
| आ. कृष्णा खोपडे, भाजप | २३,००० | ५२४४ | ८७७३ |
| आ. समीर मेघे, भाजप | ४९,००० | ३०,९०० | ५५१ |
| ॲड. आशिष जयस्वाल, | १,१४,००० | ४५,७०० | ६४७ |
| आ. मोहन मते, भाजप | ५९,००० | ३८,१०० | ४४४८ |
| आ. संजय मेश्राम, काँग्रेस | २८,००० | ३४,४०० | २७५ |
| आ. डॉ. आशिष देशमुख, भाजप | १,६२,००० | ८९,१०० | ३२,२०० |
| आ. प्रवीण दटके, भाजप | ४६,००० | ४८,२०० | २९१८ |
| आ. चरणसिंग ठाकूर, भाजप | २३,००० | २५,६०० | १३० |

## संपादकीय ......

# दुय्यम मानसिकतेतून मुक्त व्हावे

*भारताला गोर्यांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे झाली असली तरी आजही आपल्या मनातील गोर्यांच्या गुलामगिरीचे समूळ उच्चाटन झालेले नाही, त्यासाठी अजून किती काळ लागेल हेही काही निश्चित सांगता येत नाही. त्याला जशी आजूबाजूची परिस्थिती कारणीभूत आहे, तशीच आपली मानसिकताही जबाबदार आहे. गोरा माणूस दिसला की, आपण त्याची आस्थेवाईकपणे चौकशी करतो. अर्थात, काही टवाळखोर लोकांकडून गोर्या लोकांना आपल्याकडे त्रास दिला जातो. काही टॅक्सीवाल्यांकडून अधिक पैसे घेतले जातात, तो भाग वेगळा. पण एकूणच परिस्थिती पाहिली तर आजही गोर्यांनी आपल्याला शाबासकी दिली की आपण हुरळून जातो तसेच त्यांनी टीका केली की त्याची गांभीर्याने दखल घेतो. गोरे रंग पे ना इतना गुमान कर गोरा रंग दो दिन में ढल जायेगा, या गाण्याची वास्तवता आपल्या पटत असली तरी आजही आपल्याला गोर्यांनी काय म्हटले हे जास्त महत्त्वाचे वाटते. मुंबईत गेल्या काही वर्षांमध्ये मेट्रो रेलचा विस्तार वेगाने होत आहे. मुंबईकरांनी या मेट्रोमधून प्रथमच गोरेगार आणि स्वच्छ प्रवासाचा अनुभव घेतला. लोकल रेल्वेच्या फर्स्ट क्लासचे तिकीट खूप जास्त असले तरी तिथे एसी नसतो. तसेच मेट्रो इतका चकचकीतपणा नसतो. त्यामुळे लोकलच्या तुलनेच मेट्रोची सेवा ही मुंबईकरांना आलिशानच वाटते. मुख्य म्हणजे मेट्रो आणि मेट्रो स्थानके ही अतिशय स्वच्छ असतात, तिथली स्वच्छतागृहे तुंबलेली आणि घाण नसतात. ही तुलना जेव्हा आपण लोकल गाड्या आणि स्थानकांशी करतो तेव्हा जमीन अस्मानाचा फरक जाणवल्याशिवाय राहत नाही.*

*लीज नावाच्या अमेरिकन महिलेने मुंबई मेट्रो स्वच्छ आणि सुरक्षित आहे, अशी प्रशंसा करणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला. चक्क अमेरिकेन बाई भारतासारख्या तिसर्या जगातील देश म्हणून हिणवल्या जाणार्या देशातील मेट्रोची आणि तिथल्या स्वच्छतेची प्रशंसा करते आहे, इतकेच नव्हे तर अमेरिकेतील मेट्रोने यापासून शिकण्यासारखे आहे, असे म्हटल्यावर तर आपण अधिकच हुरळून गेलो. अर्थात, तिच्या अकांऊटवर जरा गर्दीच्या वेळी सकाळ संध्याकाळी लोकलमधून प्रवास करून बघा, मग कळेल, अशीही टिप्पणी काहींनी केली. लीज या अमेरिकी महिलेने केलेली प्रशंसा एका बाजूला तर फिनलंडच्या जोनास रांटालाने बांद्रा स्थानकाजवळील कचरा आणि झोपडपट्टी दाखवली त्यामुळे मोठी खळबळ उडाली होती. तो व्हिडिओ जगभर प्रसारित झाल्यानंतर रेल्वेने आपल्या जागेत झालेले अतिक्रमण हटविण्याला तात्काळ सुरुवात केली. बांद्रा रेल्वेस्थानकात अक्षरश: घुसलेली झोपडपट्टी मोठे पोलीस संरक्षण लावून पाडण्यात आली. न्यायालयाच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी केली. नाही तर त्याला काही तरी कारणे देऊन तो पुढेही ढकलला जाण्याची शक्यता होती. पण एका गोर्या माणसाने मुंबईसारख्या मेट्रो सिटीमधील रेल्वे स्थानकाची परिस्थिती दाखवली आणि रेल्वे प्रशासनाला धक्का बसला. एका बाजूला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनण्याच्या गोष्टी केंद्रातील सरकार करत आहे, विश्वगुरू होण्याच्या चर्चा सुरू आहेत. अशा स्थिती मुंबईसारख्या शहरातील रेल्वे स्थानकांची स्थिती एका विदेशी पर्यटकाने दाखवून पर्दाफाश केला. त्यानंतर आपली व्यवस्था कामाला लागली. याचा अर्थ जोपर्यंत कुणी विदेशी गोरा आपल्याला धक्का देत नाही तोपर्यंत आपण हलणारच नाही का, असाही प्रश्न उपस्थित होतो. सार्वजनिक स्वच्छता हा तर आपल्याकडील चर्चेचा नव्हे तर चेष्टेचा विषय झालेला आहे. सगळे दुसर्यांना सांगतात की, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नका, थुंकू नका, पण स्वत: मात्र ते त्या गोष्टी करत असतात. म्हणजे सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत लोका सांगे ब्रम्हज्ञान हीच आपली स्थिती असते.*

*आपण भारतीय हजारो वर्षांच्या आपल्या संस्कृतीविषयी अभिमानाने सांगत असलो तरी भारतीय संस्कृतीत सार्वजनिक स्वच्छतेचा समावेश नाही का, असा प्रश्न विचारल्यावर अनेकांच्या भावना दुखावतात. पण जोपर्यंत आपण आत्मचिंतन करत नाही, तोपर्यंत यात बदलही होणार नाही. कारण आपल्याकडील अनावस्था, कचरा, घाण याचा व्हिडिओ जेव्हा कुणी तरी गोरा विदेशी समाज माध्यमांवर टाकत नाही, तोपर्यंत आपली व्यवस्था हलत नाही. १९४७ साली आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झालो, पण मानसिक गुलामी तशीच राहिली. मानसशास्त्रज्ञ याला 'वसाहतवादाचा हँगओव्हर' किंवा 'अंतर्गत न्यूनगंड' म्हणतात. म्हणजे आपणच स्वत:ला दुय्यम समजायची सवय लावून घेतली. त्यामुळे आजही परदेशी माणसाने आपले कौतुक केले की आपल्याला ते खरे वाटते आणि त्याने टीका केली की लगेच लाज वाटते. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके आपली ओळख गरीब देश, साप-गारुड्यांचा देश, तिसर्या जगातील देश अशी होती. ही प्रतिमा पुसण्यासाठी आपण धडपडतोय. ऑलिम्पिक पदक मिळाले, ऑस्कर मिळाला, संयुक्त राष्ट्रांत आपले पंतप्रधान बोलले की आपल्याला अभिमान वाटतो. कारण त्यातून जगाने आपल्याला स्वीकारले ही भावना मिळते. पाश्चिमात्य देश, विशेषत: अमेरिका आणि युरोप यांना आपण विकसित आणि श्रेष्ठ मानतो. त्यामुळे तिथल्या नागरिकाने आपली तारीफ केली की, आता आपण खर्या अर्थाने प्रगती केली, असे आपल्याला वाटते. लीजच्या व्हिडिओमुळे मुंबईकरांना वाटले की न्यूयॉर्कलाही लाजवेल अशी आपली मेट्रो आहे. हे एक प्रकारचे प्रमाणीकरण आहे. आपण अजूनही ते बाहेरून शोधण्यासाठी धडपडतो. याउलट, स्थानिक वर्तमानपत्रात रोज तक्रारी छापून येतात, पण त्याने फारसा फरक पडत नाही. कारण त्याला आंतरराष्ट्रीय वजन नसते. ब्रिटिश राजवटीत ब्रिटिशांनी दिलेली नावे रद्द केल्यानंतर आपला राष्ट्राभिमान जागा होतो, तरीही खोलवर कुठेतरी गोरा माणूस काय म्हणतोय हे पाहण्याची सवय पूर्णपणे गेलेली नाही. या समस्येवर एकच उपाय आहे आणि तो आपल्याच हातात आहे. आपणच आपल्या लोकांचे म्हणणे गांभीर्याने ऐकायला सुरुवात केली पाहिजे. लीजने मेट्रोचे कौतुक केले ते नक्कीच आनंददायी आहे, पण त्याचवेळी रोज लोकल रेल्वेने प्रवास करणार्या लाखो मुंबईकरांनी जर स्वच्छतेबद्दल किंवा सुरक्षेबद्दल काही सूचना केल्या तर त्याचीही तितकीच दखल घेतली पाहिजे. कारण परप्रेरणा ही टिकावू नसते, आत्मप्रेरणा टिकावू असते, याचे खास उदाहरण म्हणजे बांद्रा रेल्वे स्थानकाला वेढलेल्या ज्या झोपड्या रेल्वे प्रशासनाने पाडल्या, तिथेच आता नव्याने झोपड्या बांधल्या जाऊ लागल्याचे फोटो समाज माध्यमांवर फिरू लागले आहेत.*

# नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी पुढाकार घेऊन समन्वयाने काम करावे - आयुक्त वर्षा लड्डा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेतली. या बैठकीत विविध विभागांनी केलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी पुढाकार घेऊन समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.बैठकीत अतिवृष्टी, पूरस्थिती, सखल भागांमध्ये पाणी साचणे, नाल्यांना आलेला पूर, झाडे पडणे, वीजपुरवठा खंडित होणे, रस्त्यांवरील वाहतुकीच्या समस्या तसेच इतर संभाव्य नैसर्गिक संकटांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण हे प्रशासनाचे सर्वोच्च कर्तव्य असून त्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने आणि सजगतेने काम करण्याची आवश्यकता असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.आयुक्त वर्षा लड्डा यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन हे केवळ आपत्ती व्यवस्थापन विभागाचे काम नसून प्रत्येक विभागाची त्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे सर्व विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रातील संभाव्य धोक्यांचे मूल्यांकन करून आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहावे. विभागांमधील समन्वय आणि माहितीची देवाणघेवाण प्रभावी असेल तर कोणत्याही संकटाचा सामना अधिक सक्षमपणे करता येईल, असेही त्यांनी स्पष्ट



केले.यावेळी शहरातील नाले, गटारे आणि जलनिस्सारण व्यवस्थेच्या कामांचा आढावा घेण्यात आला. पाणी तुंबण्याच्या समस्येवर नियंत्रण मिळविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सखल भाग, पूरप्रवण क्षेत्रे आणि संवेदनशील परिसरांची नियमित पाहणी करण्यास सांगण्यात आले.बैठकीत आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या कार्यपद्धतीवरही चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आपत्तीच्या प्रसंगी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री, वाहने, पंपिंग मशीन, जनरेटर आणि इतर साहित्य तत्परतेने उपलब्ध राहील याची खात्री करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व विभागप्रमुखांना आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांशी सह क्षेत्रीय स्तरावर नियमित पाहणी करण्याचे निर्देश दिले. कोणतीही समस्या उद्भवण्यापूर्वीच तिचे निराकरण करण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी केले. आपत्तीच्या काळात नागरिकांना त्वरित मदत मिळणे, नुकसान कमी करणे आणि जनजीवन सुरळीत ठेवणे ही सर्व विभागांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.बैठकीच्या शेवटी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करावे, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित प्रत्येक कामात पुढाकार घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, असे निर्देश आयुक्तांनी दिले. पावसाळ्याच्या काळात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासन तत्परतेने प्रतिसाद देईल आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, पोलीस विभाग वाहतुक शाखा निलेश गावंडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक संचालक नगर रचना सागर वानखडे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, सब डिव्हीजनल इंजि. तुषार काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिव्हील इंजि. सुनिल जाधव, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाचे सहा.अधिक्षक अभियंता तन्वी साळुंके, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी, उपअभियंता, अभियंता तसेच आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# गट-क ऑनलाइन परीक्षेला विद्यार्थ्यांचा विरोध

## ऑफलाइन पद्धत कायम ठेवण्याची एमपीएससीकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) गट-क पदभरतीची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून ऑफलाइन पद्धतीने परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी हा निर्णय मागे घेऊन पूर्ववत ऑफलाइन परीक्षा घेण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, यापूर्वी ऑनलाइन भरती परीक्षांमध्ये पेपरफुटी, तांत्रिक अडचणी, गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाची अनेक प्रकरणे समोर आली होती. त्यानंतरच विविध भरती परीक्षा घटनात्मक आयोगाकडे सोपविण्यात आल्या. त्यामुळे आता पुन्हा ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ऑनलाइन परीक्षांमुळे दूरवर परीक्षा केंद्र मिळणे, आर्थिक व मानसिक ताण वाढणे, 'नॉर्मलायझेशन' प्रक्रियेबाबत शंका तसेच परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांनी गट-कसह इतर सर्व भरती परीक्षा पूर्ववत ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, अशी मागणी केली असून एमपीएससीने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून ऑनलाइन परीक्षेचा निर्णय मागे घ्यावा व सर्व भरती परीक्षा पूर्ववत ऑफलाइन पद्धतीनेच घ्याव्यात, अशी मागणी राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# वाहतुकीचे सिग्नल्स बंद, विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ

## अनेकांचे अपघात, संघर्ष संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

शाळा सुरू होणार असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एखदा ऐरणीवर आला आहे. शहरातील अनेक महत्त्वाच्या मार्गावरील वाहतूक सिग्नल्स बंद आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अमरावती ते बडनेरा मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर हलक्या तसेच जडवाहनांची वाहतूक असते. ऑटोरिक्षा, दुचाकीसह एसटी बसेस व ट्रकची या मार्गावर नेहमीच वर्दळ राहते. याच मार्गावर समर्थ शाळेजवळ



चौकातील सिग्नल मागील अनेक दिवसांपासून बंद आहेत. हा रस्ता अतिशय वर्दळीचा असून याच मार्गावर समर्थ हायस्कूल, सामरा स्कूल, ब्रिजलाल बियाणी कॉलेज. लाटेबाई शाळा, रिम्स हॉस्पिटल असून या मार्गावरून जाणाऱ्यांची संख्यासुद्धा फार मोठी आहे. या मार्गावरून अनेकदा वाहनचालक विरुद्ध दिशेने आपली वाहने चालवितात, त्यामुळे अनेकदा अपघात होतात. याबाबत संबंधित विभागाकडे तक्रारी करण्यात आल्या, मात्र सिग्नल यंत्रणा सुरू करण्याबाबत कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, असा आरोप या भागातील नगरसेवक मिलिंद बांबल व नागरिकांनी केला आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. सिग्नल दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवक तसेच संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद बांबल यांनी दिला आहे.

# अतिसार प्रतिबंधासाठी जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' अभियान

## पाणी गुणवत्ता, स्वच्छता आणि लोकसहभागावर विशेष भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे वाढणाऱ्या अतिसारजन्य आजारांना प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत १६ जून ते ३१ जुलै, या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येत आहे. सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी आणि लोकसहभागाच्या माध्यमातून अतिसाराचा प्रादुर्भाव कमी करण्यावर या अभियानात विशेष भर देण्यात आला आहे. पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसारामुळे होणारे आजारपण व मृत्यूचे प्रमाण कमी करणे, नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे तसेच सुरक्षित पाणी व स्वच्छतेबाबत शाश्वत सवयी विकसित करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जलजीवन मिशन, ग्रामपंचायत विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) यांच्या समन्वयातून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अभियानाच्या प्रारंभी जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर समन्वय बैठका आयोजित करून ग्रामपंचायती, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, शाळा, अंगणवाडी केंद्रे तसेच संबंधित विभागांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. प्रत्येक गावामध्ये




सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सार्वजनिक शौचालयांची स्थिती, स्वच्छता व्यवस्थापन आणि पाणी गुणवत्तेचा नियमित आढावा घेतला जाणार आहे.

अभियानादरम्यान गावनिहाय पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येणार असून फिल्ड टेस्ट किटच्या माध्यमातून प्रत्यक्ष पाणी परीक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची तपासणी करून त्याची नोंद नियमितपणे अद्ययावत करण्यात येणार आहे. या उपक्रमांना देणार प्राधान्य अभियानाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून माहिती, शिक्षण व जनजागृती उपक्रमांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

शाळा व अंगणवाडी स्तरावर आरोग्यशिक्षण सत्रे, हात धुण्याचे प्रात्यक्षिक तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून सुरक्षित पिण्याचे पाणी, साबणाने हात धुण्याचे महत्त्व, अन्न स्वच्छतेचे नियम आणि अतिसार प्रतिबंधाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. गावस्तरावर विशेष स्वच्छता मोहिमा राबवून सार्वजनिक ठिकाणे, शाळा, अंगणवाडी, आरोग्यकेंद्रे व ग्रामपंचायत परिसराची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि सुरक्षित कचरा हाताळणीवर भर देण्यात येणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती** - पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाने प्रथम वर्ष बीएएमएसच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत विदर्भात अव्वल स्थान पटकावले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा मार्च-एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून महाविद्यालयाचा निकाल ९५.१६ टक्के लागला आहे. विदर्भात एकूण २८ आयुर्वेद महाविद्यालये असून त्यामध्ये एक शासकीय, पाच अनुदानित आणि उर्वरित खासगी महाविद्यालयांचा समावेश आहे. यासर्व महाविद्यालयांमध्ये पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच राज्यातील १२५ आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये हे महाविद्यालय चौथ्या क्रमांकावर राहिले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सानिका अनिल महाजन हिने ७३.६४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. प्रेरणा महेंद्र रामटेके (७२.७० टक्के) हिने द्वितीय, तर गौरी कैलास बोरे (७२.१७ टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. रणजित देशमुख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शहर, ग्रामीण भागात पोलिसांची दुचाकी फेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शहर व ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शुक्रवारी (ता. २६) दुचाकी फेरी काढून अंमली पदार्थबाबत जनजागृती केली. ग्रामीण भागात परतवाडा ठाण्यापासून दुचाकी फेरीला सुरवात झाली. व्यसनमुक्त समाज हीच खरी प्रगती, अंमली पदार्थांचा नकार, उज्वल भविष्याचा स्वीकार, नशेमुक्त युवक-सशक्त भारत, असे फलक पोलिसांच्या हाती होते. या दुचाकी फेरीचे नेतृत्व पोलिस अधीक्षक निकेतन कदम व अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी केले. ऑपरेशन कवच अंतर्गत ही दुचाकी फेरी ग्रामीण पोलिसांनी काढली. महत्त्वाची बाब म्हणजे पोलिस अधीक्षकांनी जिल्ह्यात हेल्मेट सक्तीचे आदेश जारी केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर दुचाकी फेरी सहभागी बहुतांश पोलिस कर्मचारी व अधिकाऱ्यांनी



यावेळी हेल्मेट परिधान केले होते. शहरात पोलिस आयुक्तालयाच्या वतीने सुद्धा अंमली पदार्थ विरोधी दिनी जनजागृती करण्यासाठी दुचाकी फेरी काढण्यात आली. शहर पोलिस मुख्यालयाच्या कवायत मैदानातून प्रारंभ झालेली फेरी जिल्हा परिषद कन्याशाळा चौक, इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, राजकमल व विविध मार्गाने गेली. या फेरीला पोलिस उपायुक्त श्याम घुगे व उपायुक्त उमेश धुमाळ यांनी हिरवी झेंडी दाखविली. ते दोघेही या दुचाकी फेरीत सहभागी झाले होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर


# रेल्वे उड्डाणपुलाचे काम महारेलकडे नकोच!

## आमदार संजय खोडके यांची मागणी, पुलाचे काम रखडण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–** मागील वर्षभरापासून सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेल्या अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी गेल्या मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात १२५.३७ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. यासंदर्भातील प्रशाकीय मान्यता , डिझाईन व सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामास सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत महारेल यंत्रणेकडे अमरावती आरओबीचे काम हस्तांतरित केल्यास सर्व तांत्रिक मान्यतांच्या प्रक्रिया नव्याने कराव्या लागतील. म्हणून अमरावती आरओबी पुनर्बांधणीच्या कामासाठी



नव्याने कोणतीही एजन्सी न नेमता सदरचे कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणेला कायम ठेवून कामास गती देण्याची मागणी आ. संजय खोडके यांनी विधान परिषदेत केली.आ. खोडके सभागृहात म्हणाले, १९६३ च्या सुमारास या रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलावरून शहराच्या चार भागांची वाहतूक जोडली गेली आहे. पुलाच्या स्ट्रक्चर ऑडिटमध्ये तो वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे सांगण्यात आल्याने गेल्या ऑगस्टपासून पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद आहे. त्यामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अमरावती करांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी तत्काळ निधी देऊन विहित मुदतीत व गुणवत्तापूर्वक पद्धतीने उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या अस्तित्वातील रेल्वे उड्डाण पूलाच्या जागी नवीन रेल्वे



उड्डाणपुलाचे बांधकामासाठी १२५.३७ कोटींचा निधी लागणार असल्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. त्याला गेल्या मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता केल्याने आता प्रत्यक्षात अमरावती आरओबीच्या पुर्ननिर्माण कार्याला सुरुवात झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अमरावती रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम लवकरच पूर्ण होऊन सार्वजनिक वाहतूक सुलभ होण्याचा मार्ग अधिक प्रशस्त होत असताना आता अचानक सदर काम महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कडे हस्तांतरित करण्याबाबतचे आदेश काढण्यात आले आहे. मात्र, अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची एजन्सी बदलवून महारेल संस्थेकडे अमरावती रेल्वे उड्डाणपुलाचे काम वर्ग केल्यास सर्व तांत्रिक मान्यता प्रक्रिया नव्याने करावे लागणार आहे. या प्रक्रियेला दीर्घ कालावधी लागणार असल्याने कामाला विलंब होऊन प्रकल्प रखडण्याचीसुद्धा दाट शक्यता असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

# ८ लाखाच्या एमडी ड्रग्ससह आरोपी ताब्यात



**शहर गुन्हे शाखेची कारवाई**


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती–** अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ चे अधिकारी व अंमलदार यांना रेकॉर्डवरील एक गुन्हेगार हबीब नगरातील त्याच्या राहत्या घरात मॅफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ बाळगून विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीवरून गुन्हेशाखेच्या पथकाने नागपुरी गेट पोलिस ठाणे हद्दीतील हबीब नगर, नं. १ येथे अब्दुल इजाज उर्फ इजाज चन्द्रपूर याच्या राहत्या घरी शुक्रवारी रात्री छापेमारी केली असता घरझडतीमध्ये ५४.२ ग्रॅम मॅफेड्रान आढळले. हा अंमली पदार्थ विक्रीकरीता जवळ असल्याची कबुली दिल्याने आरोपीला ८ लाख १५ हजार रुपये किंमतीच्या मॅफेड्रान ड्रग्ससह ताब्यात घेण्यात आले. त्याच्या विरोधात नागपुरी गेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, उपायुक्त रमेश धुमाळ, गुन्हे शाखा सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, गाडगेनगर विभागाचे सहायक पोलिस आयुक्त कैलाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलिस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक निरीक्षक मनीष वाकोडे, सहाय्यक निरीक्षक दशरथ आडे, सहाय्यक निरीक्षक महेश इंगोले, उप निरीक्षक गजानन सोनुने, सहाय्यक उप निरीक्षक फिरोज खान, कर्मचारी सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, नाझीमउददीन सैयद, सचिन भोयर, रंजित गावंडे, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, सागर ठाकरे, नरेश मोहरील, वर्षा घोंगडे, चेतन शर्मा, सुधीर गुडधे यांनी केली.

# ई–पीक नोंदणीसाठी सहायकांची नियुक्ती

## येत्या १५ जुलैपासून राज्यभरात नवीन पीकपाहणी मोहीम सुरू होणार सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ अमरावती,** गेल्या काही वर्षांत ई–पीक पाहणी करताना शेतकऱ्यांना आलेल्या तांत्रिक अडचणी आणि त्यामुळे मिळालेला कमी प्रतिसाद, यामुळे राज्य सरकारने यंदापासून ही पाहणी थेट तहसील स्तरावर नियुक्त सहायकामार्फत करण्याच्या निर्णय घेतला आहे. येत्या १५ जुलैपासून राज्यभरात ही नवीन पीकपाहणी मोहीम सुरू होत आहे. शासकीय योजनांच्या लाभासाठी आवश्यक असलेल्या सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना आता स्वत: धावपळ करण्याची गरज भासणार नाही. शासकीय योजना, पीककर्ज आणि पीकविम्याचा लाभ मिळविण्यासाठी ई–पीक पाहणी महत्त्वाची व आवश्यक आहे. या नोंदीमुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात अचूक भरपाई मिळण्यास मदत होते. आतापर्यंत शेतकऱ्यांना स्वतः ही नोंदणी करावी लागत होती. यामध्ये त्यांना नानाविध तांत्रिक अडचणींना सामोर जावे लागत असल्याने पुरेशा प्रमाणात नोंदणी होत नव्हती. त्याचा एकूणच परिणाम योजनांच्या फलनिष्पत्ती वर होऊन शेतकऱ्यांना लाभ मिळण्यात अडचणी जाऊ लागल्यात. त्याचा रोष सरकार व प्रशासनावर येऊ लागला. आता सरकारने यामध्ये मोठा बदल केला आहे. यंदापासून




तहसीलदार यांनी नियुक्त केलेले विशेष सहायक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची अधिकृत नोंदणी करणार आहेत. या मोहिमेला गती देण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी स्थानिक महिला बचतगटांची मदत घेतली जाणार आहे. बचतगटातील महिलांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन पीक पाहणीच्या कामात सहभागी करून घेतले जाणार आहे. काय आहे ई–पीक पाहणीची प्रक्रिया डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची नोंदणी मोबाईल पद्वारे थेट सातबारा उताऱ्यावर करण्याची ही एक शासकीय यंत्रणा आहे. यामुळे अचूक पीकपेऱ्याची नोंद होते. आतापर्यंत शेतकरी मोबाईल पद्वारे ई–पीक पाहणी करायचे, आता ती प्रक्रिया सहायक करणार आहेत. ग्रामीण भागात सर्वांकडे स्मार्टफोन उपलब्ध नाही. तसेच अनेक शेतांमध्ये मोबाईल नेटवर्कची मोठी समस्या असते. या तांत्रिक अडचणीमुळे आधी अनेक शेतकरी ई–पीक पाहणी करण्यापासून वंचित राहत होते. यामुळे यावर्षीपासून सहायकाच्या माध्यमातूनच ई–पीकपेरा नोंदणी करण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांना मोबाईलवर मिळणार संदेश

ई–पीक नोंदणीची संपूर्ण यंत्रणा आता केंद्र सरकारच्या ग्रिस्टॅक या डिजिटल कृषी परिसंस्थेशी जोडली जात आहे. यामुळे पीकपाहणी पूर्ण होताच, त्याची खात्रीशीर माहिती आणि कन्फर्मेशन मेसेज थेट शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पाठवला जाणार आहे. शेतकऱ्यांचा त्रास कमी करणे आणि सातबारावरील पिकांची ऑनलाइन नोंद अचूक होणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. १५ जुलैपासून सुरू होणाऱ्या या मोहिमेत शेतकऱ्यांनी नियुक्त सहायकांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# अमरावती शहराकरिता मिळणार स्वतंत्र तहसीलदार

## ग्रामीणकरिता अपर तहसीलदारांची नवीन पोस्टिंग,महसूल विभागाची अधिसूचना जाहीर




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती :** अमरावती तहसीलचे अमरावती शहर व ग्रामीण असे विभाजन केले जाणार असून शहराकरिता स्वतंत्र तहसीलदार देऊन ग्रामीणकरिता अपर तहसीलदारांची नवीन पोस्टिंग निर्माण करण्यात येणार आहे. महसूल विभागाकडून याबाबतची अधिसूचना काढण्यात आली आहे.जिल्ह्यातील महसूल प्रशासनाचे कामकाज अधिक लोकाभिमुख आणि गतीमान करण्यासाठी अमरावती येथे प्रस्तावित असलेल्या अपर तहसीलदार कार्यालयाबाबत १५ दिवसांची जाहीर सूचना तयार करून ती सूचना फलकावर प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले असून, या रचनेवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. या प्रस्तावानुसार आता अमरावती जिल्ह्यामध्ये अपर तहसील कार्यालय (अमरावती ग्रामीण) आणि (अमरावती शहर) अशी दोन स्वतंत्र कार्यालये अस्तित्वात येणार असून, यामध्ये समाविष्ट असणारे महसूल मंडळ, ग्राम महसूल अधिकारी यांचे साजे (तलाठी साजे) आणि गावांची विभाजन केले जाणार आहे. या दोन्ही प्रस्तावित कार्यालयांच्या हद्दीत येणाऱ्या महसूल मंडळांच्या आणि गावांच्या रचनेबाबत नागरिक व लोकप्रतिनिधींच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. याबाबतच्या लेखी हरकती व सूचना उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर कराव्यात, अशी माहिती अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी दिली आहे.

# जिल्ह्यात चार टक्के क्षेत्रात पेरण्या

## कपाशीला सर्वाधिक पसंती तर सोयाबीनसाठी प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती –** आर्द्रा नक्षत्रातील पहिल्या दोन दिवसांत झालेल्या पावसाने सरासरीतील तट भरून काढल्याने आता पेरण्यांना गती येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आतापर्यंत जिल्ह्यात चार टक्के क्षेत्रात पेरणी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र कापसाखालील आहे. २०२६–२७ च्या खरीप हंगामात जिल्ह्यात सहा लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्रात पेरण्यांचा अंदाज कृषी विभागाचा असून त्यानुसार बियाणे व खतांचे नियोजन करण्यात आले आहे. मॉन्सूनने विलंब केल्याने सर्वत्रच पेरण्या रखडल्यात. ज्याठिकाणी सिंचनाची सोय आहे, अशा भागातील शेतकऱ्यांनी पावसाची प्रतीक्षा कायम ठेवत पेरण्या केल्यात. जिल्ह्यातील एकूण पेरणी क्षेत्राच्या तुलनेत चार टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. कोरडवाहू पट्टा असलेल्या क्षेत्रात कापूस, सोयाबीन व तूर ही खरीप हंगामातील मुख्य पिके आहेत. मृगनक्षत्रातील पावसावर या पिकांच्या पेरण्यांना प्रारंभ होतो. यंदा मात्र हे नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांना पेरण्या धरता आल्या नाहीत. दरम्यान २३ व २४ जूनला झालेल्या दमदार पावसाने पावसाची तूट भरून काढत पेरणीयोग्य स्थिती निर्माण केली आहे. यामुळे आगामी काळात पेरण्यांना गती येणार आहे. आतापर्यंत झालेल्या पेरण्यांमध्ये कापसाखाली सर्वाधिक १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र आले आहे. सोयाबीनची पेरणी आवश्यक प्रमाणात पाऊस न झाल्याने रखडली आहे. आतापर्यंत तीन हजार ९८४ हेक्टरमध्येच सोयाबीनची पेरणी झाली आहे. तूर पेरणीला अद्याप प्रारंभ झालेला नाही. मूग व उडदाची पेरणी जेमतेम असून कृषी विभागानेही या दोन्ही पिकांचे पेरणी क्षेत्र प्रत्येकी एक हजार हेक्टर अंदाजित केले. मूग ७.८ व उडीद ५.६ हेक्टर क्षेत्रात पेरण्यात आला आहे. मक्याला यंदाही शेतकऱ्यांनी पसंती दिली असून १५१४ हेक्टर क्षेत्रात पेरणी



आटोपली आहे.पावसाने गाठली सरासरी १ ते २५ जूनदरम्यान झालेल्या पावसाने विलंबाने का होईना तूट भरून काढली आहे. गेल्या पंचवीस दिवसांत ९१.४ मिमी पाऊस झाला असून गतवर्षीच्या तुलनेत तो अधिक आहे. गतवर्षी या कालावधीत ८४ मिमी प्रमाण होते. या महिन्यात आतापर्यंत धारणी, अमरावती, नांदगाव खंडेश्वर, अंजनगावसुर्जी या तालुक्यात शंभर मिमीवर पाऊस झाला आहे. पेरण्यांसाठी हा पाऊस अनुकूल असल्याने या भागातील पेरण्यांना गती येणार आहे. तर चांदूररेल्वे ८९.३, दर्यापूर ९३.४, धामणगावरेल्वे ९३.४, चिखलदरा मिमी पाऊस झाल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. उर्वरित तालुक्यांतील शेतकऱ्यांना अद्याप शंभर मिमीची प्रतीक्षा आहे.

# वरुड ग्रामीण रुग्णालयात २१ रुग्णांवर शस्त्रक्रिया

## जागतिक योगदिन व पितृदिनाचे औचित्य, डॉक्टरांचे कार्य कौतुकास्पद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७वरुड–** जागतिक योगदिन आणि पितृ दिनाचे औचित्य साधून २१ जून रोजी वरुड ग्रामीण रुग्णालयात एक विशेष शस्त्रक्रिया शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरामध्ये केंद्र शासनाची आयुष्मान भव योजना आणि राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत एकूण २१ गरजू रुग्णांवर विविध सामान्य शस्त्रक्रिया निशुल्क करण्यात आल्या. या शिबिरात प्रामुख्याने अंडवृद्धी, पोटाचा हर्निया, अपेंडिक्स आणि इतर सामान्य आजारांच्या क्लीष्ट शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. यावेळी वरुड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार व डॉ. परीक्षित रामपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ञ शल्यचिकित्सक डॉ. प्रवीण बिजवे आणि डॉ. राहुल खन्ना यांनी या शस्त्रक्रिया केल्या. रुग्णांना भूल देण्याचे कार्य भूलतज्ञ डॉ. पंकज



बिजवे, डॉ. हर्षाली पावडे, डॉ. जगदीश काळभोर आणि डॉ. अश्विनी वंजारी यांनी चोख बजावले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी वरुड ग्रामीण रुग्णालयातील डॉ. शीतल राऊत, वरुड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ. घनश्याम मानकर, प्रांजली खेरडे, संदीप पवार, सागर झटाले, अक्षय सोनवणे, खुशी शेळके, राहुल वाडेकर, नीरज नेगी, ललिता गवई आणि शालू खंडारे यांनी परिश्रम घेतले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेचे प्रतिनिधी राजेंद्र सावळकर, गणेश हेटे यांच्यासह रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावा आणि गरजू रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे एकाच दिवशी २१ यशस्वी शस्त्रक्रिया करणे शक्य झाले. एकाच दिवशी २१ रुग्णांना नवीन आयुष्य मिळाल्याने रुग्णांच्या नातेवाइकांनी रुग्णालय प्रशासन आणि सर्व डॉक्टरांचे मनापासून आभार मानले.

# ई–बसमधून प्रवास करण्यासाठी शहरवासीयांना सव्वा ते दीड वर्ष प्रतिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती –** शहराची हवा शुद्ध राहावी, प्रदूषण कमी व्हावे या उद्देशाने केंद्र सरकारने अमरावती महानगर पालिकेला ५० इलेक्ट्रिक सिटी बस दिल्या असल्या तरी ई–बसमधून प्रवास करण्यासाठी शहरवासीयांना आणखी किमान सव्वा ते दीड वर्ष प्रतिक्षा करावी लागणार आहे.

कारण,आता कुठे कोंडेश्वर मार्गावरील जकात नाका व फिशरीज हब लगत असलेल्या चार्जिंग स्टेशनसह इलेक्ट्रिक बस डेपोचे काम सुरू झाले आहे. सुरक्षा भिंत उभारण्यात आली असून जनरेटर आले आहेत. मात्र, चार्जिंग स्टेशनच उभे झाले नाही.

शासनाकडून ५.८८ एकर जागा कोंडेश्वर येथे मिळाली त्याला आता किमान एक वर्ष झाले आहे. तरीही अद्याप ई–सिटी बस




चार्जिंग स्टेशन व डेपोच्या कामाने वेग घेतला नसल्याचे दिसून येत आहे. कधी विद्युत पुरवठा खंडित झाला तर बॅकपसाठी जनरेटर्स येऊन पडले आहेत. येथे एका वेळी ८ बसेसचे चार्जिंग करता येणार असून यासाठी ४ तास लागतील. एका चार्जिंग स्टेशनची क्षमता ही २४० किलोव्हॅट असून एकूण ९४० किलो व्हॅटचे क्षमतेचे सब–स्टेशन उभारण्यात आले आहे. मात्र, अद्याप बांधकाम पूर्ण झाले नसून ते प्राथमिक स्थितीत आहे. मनपाला केंद्र सरकारकडून ५० ई–बसेस मिळणार असून यात ४० बसेस या ९ मी. लांबीच्या असून त्यात ३८ आसने असतील. शहरात सध्या सुरू असलेल्या इंधनावर चालणाऱ्या सिटी बसेसची एकूणच स्थिती बघता त्या फारवेळ तग धरणार नाहीत, अशी स्थिती आहे. कारण, त्यांची सतत दुरुस्ती करून त्या रस्त्यावर चालवल्या जात आहेत. त्यामुळे ई–सिटी बसेस सुरू करण्याशिवाय मनपाकडे अन्य पर्याय नसला तरी कामातील संथपणा बघून याबाबत मनपा प्रशासन फारसे गंभीर नसल्याचे दिसून येत आहे.

# सव्वाशे दिवसांच्या अकुशल रोजगाराची हमी

## ‘विकसित भारत जी राम जी’ कायदा एक जुलैपासून होणार लागू

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

भारत सरकारने ग्रामीण भारताच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत ‘विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण) अर्थात विकसित भारत-जी राम जी अधिनियम २०२५ हा कायदा देशातील सर्व ग्रामीण भागात एक जुलैपासून लागू करण्याची अधिसूचना जारी केली आहे. ग्रामीण विकासाच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा असून, ‘विकसित भारत २०४७’ या राष्ट्रीय संकल्पनेवर पूरक अशी आधुनिक, सर्वसमावेशक, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि उत्पादकता-केंद्रित ग्रामीण विकास व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.




नवीन कायद्यांतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आर्थिक वर्षामध्ये १२५ दिवसांच्या अकुशल मजुरी रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. या वाढीव रोजगार हमीमुळे ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढण्यास, उपजीविकेची सुरक्षितता मजबूत होण्यास, गावस्त गावस्तरावर पायाभूत सुविधा निर्माण होण्यास तसेच शाश्वत ग्रामीण विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. या अधिनियमांतर्गत केवळ रोजगारनिर्मितीवर भर न देता जलसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, कृषी आणि संलग्न उपजीविका, स्थानिक आर्थिक जलसंधारण, वृक्षारोपण, शेती विकासावर भर मनरेगा अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची माहिती, रोजगार उपलब्धता, जलसंधारण, वृक्षारोपण, शेती विकास आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

विकास तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणार्‌!या आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम अशी टिकाऊ व उत्पादक मालमत्ता निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच तंत्रज्ञानाधारित प्रशासन, विविध योजनांचा समन्वित वापर, ग्रामस्तरावरील नियोजन, पारदर्शकता, साम्मलिक उत्तरदायित्व आणि परिणाम कारक अंमलबजावणी यांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. सव्वाशे दिवसाचा रोजगार मिळणार असल्याने ग्रामीण भागात समाधान व्यक्त होत आहे.

### जनसंवाद जनजागृती कार्यक्रम

विकसित भारत जी राम जी अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हास्तरावर विविध जनसंवाद जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण विकास योजनांची माहिती देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानांतर्गत ग्रामसभा, विकसित भारत ग्रामसंवाद, कामगार सन्मान कार्यक्रम, जनजागृती रॅली, शपथविधी, माहिती प्रसार उपक्रम तसेच विविध विषयांवरील चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार असून नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित केला जाणार आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, महिला बचत गट, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच सर्व नागरिकांनी या कार्यक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.-

# शेगावात मंदिर परिसरातील पेढा विक्रेत्यांवर ‘एफडीए’ची कारवाई

## भाविकांकडून अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७शेगाव**

श्री संत गजानन महाराज मंदिर परिसरातील पेढा विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने शनिवारी (दि. २७) धडक कारवाई केली. भाविकांना विकल्या जाणाऱ्या पेढ्यांच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींची गंभीर दखल घेत अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मंदिर परिसरातील प्रमुख पेढा विक्री केंद्रांची तपासणी केली. या कारवाईत दोन दुकानांवर कारवाई करण्यात आली असून पेढ्यांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी जप्त करण्यात आले.गेल्या काही दिवसांपासून मंदिर परिसरातील काही दुकानांमध्ये विक्री होणाऱ्या पेढ्यांच्या गुणवत्तेबाबत भाविकांकडून अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे, अक्षय भोपाळे आदींच्या पथकाने मंदिर परिसरातील चार ते पाच प्रमुख पेढा विक्री केंद्रांवर एकाचवेळी छापे टाकले. तपासणीदरम्यान दोन दुकानांवर कारवाई करण्यात आली. विविध प्रकारच्या पेढ्यांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी जप्त करण्यात आले असून पेढा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल, उत्पादन प्रक्रिया, स्वच्छता आणि साठवणुकीच्या पद्धतीचीही सखोल पाहणी करण्यात आली.



अन्न सुरक्षा विभागाने जप्त केलेले नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून, त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. मंदिर परिसरात दररोज हजारो भाविक येत असल्याने प्रसाद व खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला असून अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# समाधान नगर,खापर्डे बगीच्या परिसरातील नाला गेला चोरीला

## हरमकर यांची सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) परिसरात अलीकडे झालेल्या पावसानंतर निर्माण झालेल्या पूरस्थितीमागे नैसर्गिक नाला बेकायदेशीरपणे बुजविण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी माजी विरोधी पक्षनेते, नगरसेवक तथा शिवसेना शहरप्रमुख प्रवीण वसंतराव हरमकर यांनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.हरमकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, समाधान नगर, खापर्डे बगीचा, रिझर्व लाईन ते रेल्वे स्टेशन परिसरातून जाणारा जुना नैसर्गिक नाला शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी महत्त्वाचा आहे. या नाल्यात घरगुती पाण्याचे आउटलेटही जोडलेले असून वर्षभर त्यातून पाण्याचा प्रवाह सुरू असतो. मात्र, परिसरातील सुरू असलेल्या बांधकामासाठी नाल्यात माती व राडारोडा टाकून तो पूर्णपणे बुजविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, २४ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसात नाल्याचा प्रवाह बंद झाल्यामुळे पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. परिणामी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारात तसेच काही वॉर्डमध्ये पाणी शिरल्याने रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागला आणि शासकीय मालमत्तेचेही नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे.या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवून संबंधित बिल्डर, जमीनमालक आणि जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी, घटनास्थळाचा पंचनामा करून नाला तातडीने पूर्ववत खुला करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी हरमकर यांनी केली आहे. तक्रारीसोबत बंद करण्यात आलेल्या नाल्याचे छायाचित्रेही पुरावा म्हणून सादर करण्यात आली आहेत



## रवी राणांचा बच्चू कडूंवर थेट निशाणा

# फडणवीसच राहणार मुख्यमंत्री, विकासाच्या मुद्द्यावर दिले आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताकदि२७ अमरावती**

आ. बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे वक्तव्य केल्यानंतर अमरावतीच्या राजकारणात नव्या शाब्दिक संघर्षाला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रवी राणा यांनी बच्चू कडूंवर थेट निशाणा साधत सडेतोड प्रत्युत्तर दिले.रवी राणा म्हणाले की, राजकारण करण्यापेक्षा जनतेच्या विकासासाठी आणि हितासाठी खंबीरपणे काम करणाऱ्या नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. राज्याच्या विकासासाठी स्थिर नेतृत्वाची गरज असून देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहतील आणि राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जातील, असा ठाम दावा त्यांनी केला.देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व शरद पवार आणि विलासराव देशमुख यांच्यासारख्या प्रभावी मुख्यमंत्र्यांच्या तोडीचे असल्याचे सांगत रवी राणा यांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. तसेच रवी राणांचे रसायन वेगळे आहे असे म्हणणाऱ्यांनाही त्यांनी टोला लगावत, जनतेच्या हिताचे रसायन वापरून दाखवा, मगच लोकांना न्याय मिळेल, असे प्रत्युत्तर दिले.यावेळी त्यांनी भारतीय जनता पार्टी हा मोठा भाऊ असून युवा स्वाभिमान पार्टी नेहमीच छोटा भाऊ म्हणून भाजपसोबत खंबीरपणे काम करेल, अशी भूमिका स्पष्ट केली. तसेच आपल्या राजकीय अस्तित्वामागे जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा मोठा वाटा असल्याचे सांगत त्यांनी सर्व समर्थकांचे आभार मानले.रवी राणांच्या या वक्तव्यामुळे बच्चू कडू आणि राणा यांच्यातील राजकीय कलगीतुरा अधिकच रंगण्याची चिन्हे दिसत असून, आगामी काळात या शाब्दिक संघर्षाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



# कर्जमाफीसाठी आधार व ॲग्रीस्टॅक आयडी अनिवार्य

## बँका व सेवा सहकारी संस्थांकडे माहिती सादर करण्याचे निर्देश




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२७ अमरावती** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांचा आधार क्रमांक आणि ॲग्रीस्टॅक आयडी अनिवार्य करण्यात आला असून ही माहिती संबंधित बँक किंवा सेवा सहकारी संस्थेकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधा र व ॲग्रीस्टॅक नोंदणीची माहिती संबंधित बँकेला सादर करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.या योजनेअंतर्गत मुद्दल व व्याजासह जास्तीत जास्त दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम योजनेअंतर्गत माफ करण्यात येणार आहे. दोन लाख रुपयपिक्षा अधिक चकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम प्रथम भरल्यानंतरच त्यांना एकवेळ समझोता योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांच्या लाभासाठी पात्रता मिळणार आहे. तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना एकत्रित थकबाकीवर ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ दिला जाणार आहे. सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षपिकी कोणत्याही दोन वर्षांत पीककर्ज घेऊन नियमानुसार वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभमिळणार आहे. पीककर्जाची रक्कम ५० हजार रुपयपिक्षा कमी असल्यास प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा किमान पाच हजार रुपयांचा लाभदेण्यात येणार आहे.ज्यांची अद्याप पोस्टक नोंदणी झालेली नाही त्यांनी ती ताने पूर्ण करून आवश्यक माहिती संबंधित बैंक शाखा किंवा सेवा सहकारी संस्थेकडे जमा करावी, असे ही जिल्हा उपनिबंधक कार्यालया मार्फत आवाहन करण्यात आले आहे.

### दोन लाखापर्यंत कर्जमाफी

योजनेत शेतकऱ्यांनी सेवा सहकारी संस्था (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), राष्ट्रीयकृत, ग्रामीण, खासगी बँकांकडून दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान उचल केलेल्या व दि. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकित असलेल्या आणि दि. ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेल्या एक किंवा अनेक बँकांकडील सर्व थकित पीककर्ज, पुनर्गठन, फेरपुनर्गठनथकबाकीचे मुद्दल व व्याजासह अधिकतम रक्कम रु.२ लाखापर्यंत लाभदेण्यात येणार आहे.

# पटवारी विपुल ठाकरे यांना तात्काळ अटक करा

## पीडित महिलेची मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि पोलिस प्रशासनाकडे न्यायाची आर्त हाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती-** गेल्या एका महिन्यापासून न्यायासाठी संघर्ष करत असल्याचा दावा करत एका पीडित महिलेने आरोपी पटवारी विपुल भानुदास ठाकरे (रा. जिजाऊ कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती) यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. १९ मे २०२६ रोजी गाडगे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतरही अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप महिलेने केला आहे.महिलेच्या म्हणण्यानुसार, आरोपीने बंदुकीचा धाक दाखवून तिच्यावर अत्याचार केला तसेच तिच्या कुटुंबाची सुमारे ५ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली. याशिवाय, आरोपीविरुद्ध नोकरीच्या आमिषाने फसवणूक, बनावट नोटांचे प्रकरण, घरात घुसून मारहाण व चोरी, महिला व पुरुषांना सेक्स रॅकेटमध्ये अडकविणे, शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून लाखो रुपयांची फसवणूक आणि ४२० सारख्या गंभीर गुन्ह्यांचे दस्तऐवज पोलिसांना दिल्याचा दावा तिने केला आहे.तक्रारदार महिलेने आरोपीच्या वास्तव्याची माहिती, त्याच्या संपर्कातील व्यक्तींची नावे आणि इतर महत्त्वाची माहितीही पोलिसांना दिली असल्याचे सांगितले. मात्र, त्यानंतरही प्रभावी कारवाई झालेली नसल्याचा आरोप तिने केला आहे.महिलेने पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्त यांची प्रत्येकी तीन वेळा भेट घेऊन न्यायाची मागणी केली असल्याचे सांगितले. तसेच, डीबी पथकातील काही कर्मचारी, गाडगे नगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार गोरखनाथ जाधव आणि प्रहार पक्षाचे कार्यकर्ते शुभम काकडे हे आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोपही तिने केला आहे.मला किंवा माझ्या कुटुंबाला कोणतीही इजा झाली, तर त्याला विपुल ठाकरे आणि शुभम काकडे हेच जबाबदार असतील, असा इशाराही महिलेने दिला आहे.पीडित महिलेने मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून आरोपी पटवारी विपुल ठाकरे यांना तात्काळ अटक करावी, त्यांच्या संपूर्ण संपत्तीची चौकशी करावी आणि तिला न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.सदर चे वृत्त हे पीडित महिलेने केलेल्या आरोपांवर आधारित असून, संबंधित आरोपांची अधिकृत पुष्टी किंवा न्यायालयीन सिद्धता झालेली नाही. आरोपी किंवा संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका उपलब्ध झाल्यानंतर तीही प्रसिद्ध केली जाईल.-



## माजी आमदार स्व. प्रा. बी.टी देशमुख यांचे मरणोत्तर

# दिशा इंटरनॅशनल आय बँक मध्ये नेत्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

अमरावती येशील रहिवासी अमरावती पदवीधर मतदारसंघाचे सलग पाच वेळा प्रतिनिधित्व करणारे, ज्येष्ठ शिक्षक नेते, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत तथा माजी आमदार स्व. प्रा. बी.टी देशमुख यांचे दुःखद निधन झाले. देशमुख परिवारावर दुःखाचा डोगर कोसळले, परंतु अशाही परिस्थितीत दिशा इंटरनॅशनल आय बँकेचे शुभचिंतक विलास मराठे व अनंत मराठे यांनी देशमुख परीवाला नेत्रदान करण्यास प्रेरीत केले. मुलगी डॉ. वैशाली वानखडे यांनी आपले वडील स्व. प्रा. भाऊराव तुळशीराम देशमुख यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीचे सचिव श्री स्वप्निल अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे डेप्युटी मेडिकल डिरेक्तर डॉ अंकित हरवानी, श्री हिमांशू प्रमोद बंड, श्री अनिल सदाशिवराव देशमुख यांनी मरनोतर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.नेत्रदानाचे पवित्र कार्य केल्याबद्दल दिशा एज्युकेशन फाऊंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँकच्या संचालक मंडळाद्वारे देशमुख कुटुंबियांचे आभार व्यक्त करणात आले. देशमुख परीवाराला नेत्रदान केल्या बद्दल मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नेत्रदानाचे प्रमाणपत्र देण्यात आले. या सेवाभावी कार्यात देशमुख परिवारातील डॉ. वैशाली वानखडे, डॉ. अतुल जैन, डॉ. रविंद्र वाघमारे, डॉ. निलेश इंगळे तसेच परिवारातील इतर सदस्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. दिशा ग्रुप व दिशा इंटरनॅशनल आय बँकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी स्व. प्रा. भाऊराव तुळशीराम देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण केली.

